REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 10 | ISSUE - 3 | DECEMBER - 2020

# तुरुंगातील परिस्थितीचा अभ्यास: विशेष संदर्भ अधिकारी आणि कर्मचारी

[१]बाबासाहेब सखाराम भुकतरे, [२]प्रा. डॉ. सुरेश बळीराम गजभरे
[१]संशोधक
[२]शंकरराव चव्हाण महाविद्यालय अर्धापुर, ता, अर्धापुर जि. नांदेड

**गोषवारा:**

प्रशिक्षण व शिस्त सुधारण्यासाठी अनेक उपाय सुचविले होते. पण विचार करण्यासारखी बाब म्हणजे सरकारने समित्यांच्या स्थापनेचा विचार केला आणि त्यांच्या शिफारशींची अंमलबजावणी न करता समस्येचे निराकरण केले. सत्तरच्या दशकाच्या उत्तरार्धात, तिहार तुरुंगात आणि बऱ्याच राज्यांच्या तुरूंगात वारंवार गोंधळ होत असताना, भारत सरकारने जुलै १९८०मध्ये जस्टिस ए.एन. मुल्ला यांच्या अध्यक्षतेखाली आणखी एक समिती नेमली. १९१०-२० च्या पूर्ववर्तीप्रमाणेच समितीने कारागृहातील सध्याच्या परिस्थितीची सखोल छाननी केली आणि उपयुक्त शिफारसींसह एक युक्त दस्तावेज तयार केला. त्यामध्ये सुधारात्मक आणि काळजी घेण्याच्या उपाययोजना आणि तुरूंग अधिकाऱ्यांच्या मानवी व सुधारक संवर्ग तयार करण्याची जोरदार विनंती केली. फाशीची शिक्षा रद्द करण्याची विनंती केली आणि फौजदारी प्रक्रिया संहितेमध्ये कलम ४३३ अ च्या जोडण्याला अतिशय कठोर शब्दांत निषेध केला आणि विनाकारण जन्मठेपेची शिक्षा ठोठावल्यामुळे हा हटविण्याचा सल्ला देण्यात आला



**प्रस्तावना:**

शिक्षेमुळे व्यक्ती चांगल्या व्यक्तीमध्ये बदलू शकते आणि त्यांचे मूलभूत स्वातंत्र परत मिळू शकते आणि त्यांना त्यांच्या कुटुंबातील सदस्यांसह समाजात मुक्तपणे जगण्याची संधी देखील मिळू शकते. काहीवेळा या तुरुंगवासाच्या माध्यमातून कैद्यांना / गुन्हेगारांना काम देखील मिळते जेणेकरून ते पुन्हा गुन्हा करण्यापासून लांब राहू शकतील, त्यामुळे गुन्हेगारांसाठी शिक्षा महत्त्वाची आहे.

**नमुना निवड:**

संशोधन कार्यासंदर्भात सामाजिक शास्त्रातील संशोधन कार्य हे वेगवेगळ्या संशोधन केले जाते. त्यापैकी नमुना निवड ही एक पद्धत आहे. या पद्धतीचा उपयोग प्रस्तुत संशोधन कार्यात केला गेला आहे. नमूना म्हणुन मराठवाड्यातील प्रातिनिधीक स्वरुपात चार तुरुंगाची निवड करण्यात आले आहे.

या संशोधनासाठी संशोधकाने एकूण ४ तुरुंगातून ४ अधिकारी ४ उप-अधिकारी, १३ कर्मचारी असे एकूण १५ अधिकारी कर्मचारी आणि पुरुष आणि स्त्री असे एकूण ४०० कैद्यांची निवड करण्यात आली आहे.

अधिकारी कार्मचारी वर्ग निवडताना संशोधकाने प्रत्येक तुरुंगातून १ अधिकारी १ उप-अधिकारी आणि १३ स्त्री आणि पुरुष कर्मचारी असे एकूण १५ जणांची निवड करण्यात आले असून प्रत्येक तुरुंगातून ५० कैदी असे २०० कैद्यांची निवड करण्यात आली आहे.

हे चारही तुरुंग मराठवाड्यातील औरंगाबाद, नांदेड, लातूर आणि उस्मानाबाद जिल्ह्यातून निवडण्यात आले आहेत.

**सारणी क्र. ३.१ नमुना निवड**

| अ.क्र. | तुरुंग | अधिकारी कर्मचारी | कैदी |
|---|---|---|---|
| १. | औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह | १५ | ५० |
| २. | लातूर मध्यवर्ती कारागृह | १५ | ५० |
| ३. | नांदेड मध्यवर्ती कारागृह | १५ | ५० |
| ४. | उस्मानाबाद मध्यवर्ती कारागृह | १५ | ५० |
| **एकूण** | | **६०** | **४००** |

**तथ्य संकलन:**

संशोधन कार्यासंदर्भातील जी वास्तविक माहिती संकलीत केली जाते त्यास तथ्य असे म्हटले जाते. प्रस्तुत संशोधन कार्यात प्राथमिक आणि दुय्यम तंत्राचा आधार घेऊन हे संशोधन कार्य पूर्ण केले गेले आहे. यामध्ये प्रत्यक्ष भेट, मुलाखती, अनुसूची, प्रश्नावली इत्यादी साधनाद्वारे माहिती संकलित करण्यात आले आहे, तसेच पूस्तके, नियतकालिके, वृत्तपत्रे, संकेतस्थळे इत्यादीचा उपयोग घेतले गेले आहे.

**व्याप्ती आणि मर्यादा:**

तुरुंग प्रशासन ही संकल्पना सर्व जगभर व्यापलेली आहे. तीचे एकंदरीत एकाच वेळी अध्ययन करणे अशक्य आहे प्रस्तुत संशोधन कार्यासाठी मराठवाडा विभागातील तुरुंग व त्यांचे प्रशासन ही मर्यादा व व्याप्ती निश्चित करण्यात आली आहे. हे संशोधन कार्य उपरोक्त व्याप्तीकरीता सीमित आहे.

**अपेक्षित उपयुक्तता:**

कोणतेही संशोधन कार्य हे समाज उपयुक्त असणे ही काळाची गरज झाली आहे. संशोधनातून समाजात असणाऱ्या विविध वास्तविक समस्याची उकल होत असते, संशोधन हे समाजाला योग्य दिशा देणारे असते, परिवर्तनात्मक मुख्य घटकाला चालना देणारे असते प्रस्तुत संशोधनाची फलश्रुती ही तुरुंगातील अप्रशिक्षीत, प्रशिक्षीत कर्मचारी, निरक्षर कैदी सर्वसामान्य जनतेला तुरुंग प्रशासनाची सखोल माहिती, शासनाच्या विविध समित्या संदर्भातील योग्य निर्णय घेण्यासाठी त्याच बरोबर तुरुंगातील कैद्याच्या मानसीकतेत असलेला नकारात्मकता दूर करण्यासाठी व संबंधित तुरुंग प्रशासनातील विविध ध्येय धोरणे. योजना ठरविण्यासठी हे संशोधन कार्य उपयुक्त ठरणार आहे.

**सारणी क्र. १.१ आपण काम करत असलेल्या तुरुंगाजवळ आपल्या निवासाची व्यवस्था आहे का**


| क्र. | निवासाची व्यवस्था | प्रतिसादक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ३८ | ६३.३३ |
| २. | नाही | ३२ | ५३.३३ |
| **एकूण** | | **६०** | **१००.००** |

स्त्रोत: प्राथमिक माहिती

तुरुंगात काम करणाऱ्या तुरुंग अधिकारी आणि कर्मचारी यांना कारागृहाच्या / शासनाच्या वतीने निवासस्थान देणे हे अनिवार्य आहे, मात्र काही कारागृहाच्या / शासनाच्या वतीने सर्वच तुरुंग अधिकारी / कर्मचार्यांना निवासस्थान देणे शक्य नाही.

उपरोक्त सारणी क्र. १.१ हे तुरुंग अधिकारी/कर्मचारी हे काम करत असलेल्या तुरुंगाजवळ त्यांना निवासाची व्यवस्था आहे का याचे विवरण करणारे असून, निवडलेल्या एकूण ६० प्रतीसादकांपैकी ३८ (६३.३३%) प्रतीसादकांच्या मते ते काम करत असलेल्या तुरुंगाजवळ त्यांना निवासाची व्यवस्था आहे, तर उर्वरित ३२ (५३.३३%) प्रतीसादकांच्या मते ते काम करत असलेल्या तुरुंगाजवळ त्यांना निवासाची व्यवस्था नाही. उपरोक्त सारणी वरून असे निदर्शनास येते की कारागृहातध्तुरुंगात काम करणाऱ्या अधिकारीध्कर्मचारी यांना निवासाची व्यवस्था तुरुंगाजवळ/कारागृहाजवळ आहे.

**आलेख क्र. ४.३८ आपण काम करत असलेल्या तुरुंगाजवळ आपल्या निवासाची व्यवस्था आहे का**




**सारणी क्र. १.२ संरक्षण आणि सुधारात्मक यापैकी आपण कोणते कार्य अधिक महत्त्वाचे मानता?**

| क्र. | संरक्षण आणि सुधारात्मक कार्य | प्रतिसादक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | संरक्षण | १५ | २५.०० |
| २. | सुधारात्मक | १३ | २१.६७ |
| ३. | दोन्ही | ३२ | ५३.३३ |
| **एकूण** | | **६०** | **१००.००** |


स्त्रोतः प्राथमिक माहिती

तुरुंगाच्या सुरक्षेचा एक मूलभूत पैलू म्हणजे संस्थेची भौतिक सुरक्षा. भौतिक सुरक्षेच्या पैलूंमध्ये तुरुंगाच्या इमारतीचे वास्तुकला, त्या इमारतीच्या भिंतींची मजबुती, खिडक्यावरील बार, निवास युनिट्सचे दरवाजे आणि भिंती, परिमिती भिंती आणि कुंपण, टेहळणी बुरूज इत्यादींचा समावेश आहे.

उपरोक्त सारणी क्र. १.२ हे तुरुंगात/कारागृहात काम करणारे अधिकारी आणि कर्मचारी यांना कैद्यांचेध्कारागृहाचे संरक्षण आणि सुधारात्मक यापैकी ते कोणते कार्य अधिक महात्वाचे मानतात याचे विवरण करणारे असून निवडण्यात आलेल्या ६० प्रतीसादकांपैकी १५ (२५.००%) प्रतिसादकांना संरक्षणाचे काम अधिक महत्वाचे मानतात, १३ (२१.६७%) प्रतिसादकांना सुधारात्मक काम अधिक महत्वाचे आहे असे वाटते तर

उर्वरित ३२ (५३.३३%) प्रतिसादकांना संरक्षण आणि सुधारात्मक हे दोन्ही कार्य महत्वाचे मानतात. उपरोक्त सारणी वरून असे निदर्शनास येते की, जास्तीत जास्त अधिकारी आणि कर्मचारी यांना दोन्ही कामे करण्यास महत्व मानतात.

**आलेख क्र. १.३ संरक्षण आणि सुधारात्मक यापैकी आपण कोणते कार्य अधिक महत्त्वाचे मानता?**




**सारणी क्र. १.४ संरक्षण आणि सुधारात्मक हे दोन्ही वेगळे असले तरी दोन्हीचा उद्देश एकच आहे, असे आपणास वाटते का?**


| क्र. | संरक्षण आणि सुधारात्मक कार्य | प्रतिसादक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ३८ | ६३.३३ |
| २. | नाही | २२ | ३६.६७ |
| **एकूण** | | **६०** | **१००.००** |

स्त्रोतः प्राथमिक माहिती

उपरोक्त सारणी क्र. १.४ हे संरक्षण आणि सुधारात्मक हे दोन्ही कार्य वेगळे असले तरी दोन्हींचा उद्देश एकच आहे का याचे विवरण करणारे असून, निवडण्यात आलेल्या ६० प्रतीसाद्कांपैकी ३८ (६३.३३%) प्रतिसादकांना संरक्षण आणि सुधारात्मक या दोन्ही कार्याचे उद्देश एकच असल्याचे वाटते, तर उर्वरित २२ (३६.६७%) अधिकारी आणि कर्मचारी प्रतिसादकांना संरक्षण आणि सुधारात्मक या दोन्ही कार्याचे उद्देश एकाच असल्याचे वाटते.

उपरोक्त सारणी वरून असे निदर्शनास येते की, कैद्यांचे / कारागृहाचे संरक्षण आणि सुधारात्मक या दोन्ही कार्याचे उद्देश एकच असल्यासारखे वाटते.

**आलेख क्र. १.४ संरक्षण आणि सुधारात्मक हे दोन्ही वेगळे असले तरी दोन्हीचा उद्देश एकच आहे, असे आपणास वाटते का?**




**सारणी क्र. १.५ सुटकेनंतर मुक्त झालेल्या कैद्याना पुनर्वसन करण्यात तुरुंग प्रशासन/शासन समाधानकारकपणे काम करते का?**


| क्र. | पुनर्वसन कार्य | प्रतिसादक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | २६ | ४३.३३ |
| २. | नाही | १४ | २३.३४ |
| ३. | सांगू शकत नाही | २० | ३३.३३ |
| **एकूण** | | **६०** | **१००.००** |

स्त्रोत: प्राथमिक माहिती

पुनर्वसन कार्यक्रम सामान्यतरू पुन्हरू गुन्हे कमी करण्यासाठी प्रभावी असते जर त्यात तीन मुख्य तत्त्वे असत्तात. प्रथम, कार्यक्रम "पुराव्यावर आधारित" असते, म्हणजे ती पुनरावृत्ती कमी करण्यासाठी दर्शविलेल्या कार्यक्रमानंतर तयार केलेला असतो आणि प्रत्यक्षात सिद्ध कार्यक्रमाप्रमाणेच कार्य करतो. दुसरे, कार्यक्रमाचे मूल्य-प्रभावीतेसाठी मूल्यमापन केले पाहिजे. तिसरे, कार्यक्रमाने सर्वाधिक जोखीम असलेल्या आणि सर्वाधिक गरज असलेल्या कैद्यांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे, कारण यात पुनरावृत्ती कमी करण्याची सर्वात मोठी क्षमता आहे.

उपरोक्त सारणी क्र. १.५ हे कारागृहातील कैद्यांचे सुटकेनंतर मुक्त झालेल्या कैद्यांना पुनर्वसन करण्यास तुरुंग प्रशासन/शासन समाधानकारकपणे काम होते का याचे विवरण असून निवडण्यात आलेल्या एकूण ६० प्रतीसादकांपैकी २६ (४३.३३%) प्रतिसादकांना कैद्यांना पुनर्वसन करण्यास तुरुंग प्रशासनध्शासन समाधानकारकपणे करते असे वाटते, १४ (२३.३४%) प्रतिसादकांना कैद्यांना पुनर्वसन करण्यास तुरुंग प्रशासनध्शासन समाधानकारकपणे काम करत नाही अये वाटते तर उर्वरित २० (३३.३३%) प्रतिसादकांनी आपले कोणतीच प्रतिक्रिया दिलेली नाही.

**आलेख क्र. १.६ सुटकेनंतर मुक्त झालेल्या कैद्याना पुनर्वसन करण्यात तुरुग प्रशासनध्शासन समाधानकारकपणे काम करते का?**




**सारणी क्र. १.७ कारागृहात राहण्याची स्थिती खराब होणे हे मुख्यतः जास्त गर्दी किंवा क्षमतेपेक्षा जास्त कैद्यांना प्रवेश दिल्यामुळे होते असे आपणास वाटते का**


| क्र. | कारागृहाची खराब स्थिती | प्रतिसादक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | २९ | ४८.३३ |
| २. | नाही | १३ | २१.६७ |
| ३. | सांगू शकत नाही | १८ | ३०.०० |
| **एकूण** | | **६०** | **१००.००** |

स्त्रोतः प्राथमिक माहिती

कारागृहात गर्दी वाढणे हा गुन्हेगारी न्याय धोरणाचा परिणाम आहे कारागृहात कैद्यांची गर्दी वाढल्याने आरोग्यसेवा, अन्न आणि निवास यासारख्या मूलभूत मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी तुरुंग प्रणालीची क्षमता कमी पढते. चाचणीपूर्व अटकेचा अतिवापर आणि किरकोळ, किरकोळ गुन्ह्यांसाठी तुरुंगाचा वापर, हे तुरुंगातील लोकसंख्येच्या दराचे गंभीर चालक आहेत. जास्त गर्दी, तसेच संबंधित समस्या जसे की गोपनीयतेचा अभाव, देखील मानसिक आरोग्य समस्यांना कारणीभूत ठरू शकतो किंवा वाढवू शकतो आणि हिंसाचार, स्वतः ची हानी आणि आत्महत्या यांचे प्रमाण वाढवू शकतो.

उपरोक्त सारणी क्र. १.७ हे कारागृहाची खराब स्थिती हे कारागृहात वाढत चाललेल्या रोजच्या गर्दीमुळे होते का याचे विवरण करणारे असून निवडण्यात आलेल्या ६० अधिकारी आणि कर्मचारी प्रतीसादकांपैकी २९ (४८.३३%) प्रतिसादकांनी कारागृहात राहण्याची स्थिती खराब होण्यामागचे मुख्य कारण म्हणजे कारागृहात होणारी जास्त गर्दी किंवा क्षमेतेपेक्षा जास्त कैद्यांना प्रवेश दिल्यामुळे होते असे वाटते, १३ (२१.६७%) प्रतीसादकांच्या मते कारागृहात राहण्याची स्थिती खराब होण्यामागचे मुख्य कारण हे कारागृहात होणारी जास्त गर्दी किंवा क्षमेतेपेक्षा जास्त कैद्यांना प्रवेश दिल्यामुळे होते असे त्यांना वाटत नाही, आणि उर्वरित १८ (३०. ००%) अधिकारी आणि कर्मचारी प्रतिसादकांनी आपली कोणतीच प्रतिक्रिया दिलेली नाही.

**आलेख क्र. १.७ कारागृहात राहण्याची स्थिती खराब होणे हे मुख्यत: जास्त गर्दी किंवा क्षमतेपेक्षा जास्त कैद्यांना प्रवेश दिल्यामुळे होते असे आपणास वाटते का**




**सारणी क्र. १.८ कैद्यांना पुरविले जाणारे आहार आणि कपडे पुरेसे आहेत असे आपणास वाटते का**


| क्र. | कारागृहाची खराब स्थिती | प्रतिसादक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ३८ | ६३.३३ |
| २. | नाही | ०६ | ०१.०० |
| ३. | सांगू शकत नाही | १६ | २६.६७ |
| **एकूण** | | **६०** | **१००.००** |

स्त्रोत: प्राथमिक माहिती

कारागृह कायदा-१८९४ आणि मॉडेल जेल मॅन्युअल कारागृह प्रशासनासाठी कैद्यांना त्यांच्या मूलभूत अधिकारांपासून वंचित ठेवता येणार नाही याची खात्री करण्यासाठी करण्यात आली आहे. प्रत्येक कारागृहातील कैद्याला पुरेसे अन्न आणि पुरेसे कपडे देणे कायद्याने अनिवार्य आहे.

उपरोक्त सारणी क्र. १.८ हे कैद्यांना पूर्वेला जाणारे आहार आणि कपडे हे पुरेसे आहेत का याचे विवरण करणारे असून, निवडण्यात आलेल्या ६० अधिकारी आणि कर्मचारी प्रतीसादकांपैकी ३८ (६३.३३%) प्रतीसादकांच्या मते कैद्यांना पुरविले जाणारे अन्न व कपडे हे पुरेसे आहेत असे त्यांना वाटते, ६ (१.००%) अधिकारी आणि कर्मचारी यांच्या मते त्याच्या कारागृहातील कैद्यांना पुरविले जाणरे अन्न आणि कपडे हे पुरेसे नाहीत आणि उर्वरित १६ (२६.६७%) अधिकारी आणि कर्मचार्यांनी आपले कोणतेच मत मांडलेले नाही.

आलेख क्र. १.८ कैद्यांना पुरविले जाणारे आहार आणि कपडे पुरेसे आहेत असे आपणास वाटते का




सारणी क्र. १.९ कारागृहामध्ये वयोवृद्ध कैद्यांना वेगळे ठेवले जाते का?


| क्र. | वयोवृद्ध कैदी | प्रतिसादक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १५ | २५.०० |
| २. | नाही | २६ | ४३.३३ |
| ३. | सांगू शकत नाही | १९ | ३१.६७ |
| **एकूण** | | **६०** | **१००.००** |

स्त्रोत: प्राथमिक माहिती

तरुण कैद्यांच्या तुलनेत, वृद्ध कैद्यांची प्रकृती खराब असते. वृद्ध कैद्यांसाठी वेगळे करण्याच्या बाजूने युक्तिवाद दोन महत्त्वाच्या जागेवर थांबतो. प्रथम, तुरुंगवासाचा उद्देश सर्व कैद्यांसाठी पुनर्वसनाच्या तत्त्वज्ञानाद्वारे तयार केलेला असावा. दुसरे, वृद्ध कैद्यांना पुनर्वसन सुधारात्मक वातावरणासाठी तितकेच पात्र मानले पाहिजे.

उपरोक्त सारणी क्र. १.९ हे कारागृहामधील वयोवृद्ध कैद्यांना वेगळे ठेवले जाते का याचे विवरण करणारे असून, निवडण्यात आलेल्या ६० अधिकारी आणि कर्मचारी प्रतीसादकांपैकी १५ (२५.००%) प्रतीसादकांच्या मते त्यांच्या कारागृहातील वयोवृद्ध कैद्यांना वेगळे ठेवले जाते, २६ (४३.३३%) प्रतीसादकांच्या मते कारागृहातील वयोवृद्ध कैद्यांना वेगळे ठेवले जात नाही, आणि उर्वरित १९ (३१.६७%) अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपली कोणतीच प्रतिक्रिया दिलेली नाही.

**आलेख क्र. ४.४४ कारागृहामध्ये वयोवृद्ध कैद्यांना वेगळे ठेवले जाते**




**सारणी क्र. १.१० कारागृहातील कैद्यांना शिक्षण घेण्याची संधी व त्यांच्या कलागुणांना वाव दिला जातो का?**


| क्र. | शिक्षण घेण्याची संधी व कलागुणांना वाव | प्रतिसादक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ५६ | ९३.३३ |
| २. | नही | ०० | ००.०० |
| ३. | सांगू शकत नाही | ०४ | ०६.६७ |
| **एकूण** | | **६०** | **१००.००** |

स्त्रोत: प्राथमिक माहिती

तुरुंगातील/तुरुंगातून शिक्षण हे तुरुंगात होणा-या कोणतीही शैक्षणिक क्रियाकलाप असू शकते. या अभ्यासक्रमांमध्ये मूलभूत साक्षरता कार्यक्रम, माध्यमिक शाळा समतुल्य कार्यक्रम, व्यावसायिक शिक्षण आणि तृतीयक शिक्षण समाविष्ट असू शकते. इतर क्रियाकलाप जसे की पुनर्वसन कार्यक्रम, शारीरिक शिक्षण आणि कला आणि हस्तकला कार्यक्रम देखील तुरुंगातील शिक्षणाचा एक प्रकार मानला जाऊ शकतो. कार्यक्रम सामान्यतरु तुरुंग प्रणालीद्वारे प्रदान केले जातात, व्यवस्थापित केले जातात आणि निधी दिला जातो, जरी कैद्यांना दूरशिक्षण कार्यक्रमांसाठी पैसे द्यावे लागतील. तुरुंगातील शिक्षणाचा इतिहास आणि सध्याच्या पद्धती देशांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल झालेले आहे. तुरुंगातील हजारो कैदी केक, एलईडी बल्ब, फर्निचर अशा वस्तू बनवण्याच्या युनिटमध्ये काम करतात. त्यांच्यासाठी तुरुंगातील नोकरी म्हणजे बाहेर नोकरी मिळविण्या सारखे आहे.

उपरोक्त सारणी क्र. १.१० कारागृहातील कैद्यांना शिक्षण घेण्याची संधी व त्यांच्या कलागुणांना वाव दिला जातो का याचे विवरण करणारे असून, निवडण्यात आलेल्या ६० अधिकारी आणि कर्मचारी प्रतीसादकांपैकी ५६ (९३.३३%) प्रतीसादकांच्या मते कारागृहातील कैद्यांना शिक्षण घेण्याची संधी व त्यांच्या कलागुणांना वाव दिला जातो, तर उर्वरित ४ (६.६७%) प्रतिसादकांनी आपली कोणतीच प्रतिक्रिया दिलेली नाही. यावरून असे निदर्शनास येते की, शक्यतो सगळ्याच कारागृहातील कैद्यांना शिक्षण घेण्याची संधी दिली जाते आणि त्यांच्या कलागुणांना देखील वाव दिला जातो.

**आलेख क्र. १.१० कारागृहातील कैद्यांना शिक्षण घेण्याची संधी व त्यांच्या कलागुणांना वाव दिला जातो**




## निष्कर्ष:

तुरुंगातील प्रत्येकाचे जीवनमान समान आहे. त्याच परिस्थितीमुळे त्याची सामूहिक भावना आहे. अल्प मुदतीची शिक्षा झालेल्या कैद्यांचे मन स्थिर नसते. तिला टाकून पुढे जाण्याची वेळ आली आहे. सराईत गुन्हेगार कैदी म्हणून येतात तेव्हा अशा नवशिक्या गुन्हेगारांना ते आकर्षित करतात. तुरुंगातील नियमांचे उल्लंघन करण्याकडे त्यांचा कल अधिक असतो. तुरुंग अधिकाऱ्यांशी त्यांचे भांडण झाले. गुन्हेगारांसाठी कारागृहे स्वतंत्र वसाहतींच्या स्वरूपात असणे आवश्यक आहे. समाजापासून वंचित राहिल्याबद्दल पश्चात्ताप दाखवण्याची आणि सुधारण्याची इच्छा बाळगण्याची त्यांची शक्यता कमी असते. असे मानले जाते की बहुसंख्य कैद्यांचे वर्तन शिस्तबद्ध आणि सुधारण्यास अनुकूल असते. शिधावाटप, कैद्यांची हजेरी आदी कामे त्यांच्यामार्फतच करता येतात. कैदी आणि अधिकारी यांच्यातील सामाजिक अंतर कमी होऊन काम विश्वासाने केले जाते, त्यामुळे अधिकाऱ्याबद्दल आपुलकी निर्माण होते. चांगल्या वागणुकीमुळे काही कैद्यांना जबाबदाऱ्या मिळाल्या आहेतय इतर कैद्यांसाठीही हे चांगले आहे.

## संदर्भ:

1. Jayasree Lakkaraju, Women Prisoners in Custody (2008), Kaveri Books, New Delhi, p. 138.
2. Id., p. 117.
3. The Indian Prisons Bill, 1996 46 The Prison Administration and Treatment of Prisoners Bill, 1998.
4. The Prison Management Bill, 1998 48 Supra n. 26.
5. Rupert Cross, Punishment, Prison and The Public (1971), The Hamlyn Trust, London, p.43
6. ibid.
7. Mike Place and David A. Sands, “The Evolution of Judicial Involvement” in Paul F. Cromwell, Jr., Jails and Justice (1975), Charles Thomas Publisher, Springfield, pp. 237-45.
8. Indra J. Singh, Indian Prison: A Sociological Enquiry (1979), Concept Publishing Company, Delhi, pp. 160-1. 53 Supra n. 39 at p.59.